
# आपण वेगळे आहोत



आशीष रायचूर

**विनामूल्य वाटपासाठी**
ऑल पीपल्स चर्च एंड वर्ल्ड आउटरीच, बैंगलोर, भारतद्वारे निर्मित आणि वितरित।
वर्तमान आवृत्ती: 2024

**संपर्क सूचना**
All Peoples Church & World Outreach,
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: **bookrequest@apcwo.org**
Website: **apcwo.org**

अन्यथा सूचित केले नसल्यास, पवित्र शास्त्रातील सर्व संदर्भ द बायबल सोसायटी ऑफ इंडिया (BSI) द्वारे प्रकाशित पवित्र बायबल, बीएसआय - मराठी - ओ.व्ही मधून उद्‌त करण्यात आले आहेत. परवानगीने. सर्व हक्क राखीव.

**आर्थिक भागिदारी**
या पुस्तकाचे विनामूल्य वितरण ऑल पीपल्स चर्चचे सदस्य, सहभागी आणि मित्रांच्या आर्थिक मदतीमुळे शक्य झाले आहे. जर आपण या विनामूल्य प्रकाशनाद्वारे आशीर्वाद प्राप्त केला असेल, तर आम्ही आपणास ऑल पीपल्स चर्चच्या विनामूल्य प्रकाशनांच्या मुद्रणासाठी तसेच वितरणासाठी आर्थिक अंशदान देण्यासाठी आमंत्रित करतो. कृपया **apcwo.org/give** वर जावे अथवा आपले दान कसे द्यावे हे पाहण्यासाठी या पुस्तकाच्या मागे “ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी” हे पृष्ठ पाहावे. धन्यवाद!

**मुफ़्त संसाधन आणि संबंधित माहिती**

**संदेश:** apcwo.org/sermons | **पुस्तके:** apcwo.org/books | **चर्च ऑप:** apcwo.org/app
**बायबल कॉलेज:** apcbiblecollege.org | **ई-लर्निंग:** apcbiblecollege.org/elearn
**सल्ला:** chrysalislife.org | **संगीत:** apcmusic.org
**मिनिस्टर्स फेलोशिप:** pamfi.org | **एपीसी वर्ल्ड मिषन:** apcworldmissions.org

(Marathi — We are Different)

# आपण वेगळे आहोत

# अनुक्रमणिका


1. अंधारातून त्याच्या प्रकाशात पाचारिलेले 1
2. परमेश्वराचे वचन विरुद्ध जगाची संस्कृती 8
3. आपण वेगळे आहोत 10

# 1
# अंधारातून त्याच्या प्रकाशात पाचारिलेले

**1 पेत्र 2:9**

**पण तुम्ही तर निवडलेला वंश, राजकीय याजकगण, पवित्र राष्ट्र, देवाचे 'स्वतःचे लोक' असे आहात, ह्यासाठी की, ज्याने तुम्हाला अंधकारातून काढून आपल्या अद्‌त प्रकाशात पाचारण केले त्याचे गुण तुम्ही प्रसिद्ध करावेत**

तुम्ही आणि मी देवाचे *"स्वतःचे खास लोक"* आहोत. जर आपण ख्रिस्ती—विश्वासणारे असाल तर आपण पात्र आहात! पवित्र शास्त्र स्पष्ट करते की आपण *"निवडलेला वंश, राजकीय याजकगण, पवित्र राष्ट्र, देवाचे स्वतःचे लोक"* असे आहोत हे यासाठी की आपण त्या परमेश्वराची स्तुती, श्रेष्ठता, अद्‌तता आणि गुण घोषित केले पाहिजेत, प्रचार केले पाहिजेत, गाजविले पाहिजेत ज्याने आम्हास अंधारातून काढून त्याच्या अद्‌त प्रकाशात पाचारण केले आहे. जेव्हा लोक आम्हाला, ख्रिस्ती लोकांना पाहतात, तेव्हा त्यांना हे पाहण्याची गरज आहे की ज्याने आम्हास पाचारण केले आहे तो किती उत्कृष्ट, सद्‌णी, परिपूर्ण आणि अद्‌त परमेश्वर आहे परमेश्वराला चांगले दाखवावे म्हणून तुम्ही आणि मी पृथ्वीवर आहोत!

पवित्र शास्त्र म्हणते की आम्हाला *"अंधारातून काढून त्याच्या अद्‌त प्रकाशात पाचारण"* करण्यात आले आहे. एकेकाळी आम्ही अंधाराच्या वातावरणात जगत होतो. ते आमच्या विचारप्रक्रियेस, आचरणांस, आणि संस्कृतींस घडवीत होते. परंतु परमेश्वराने आम्हाला त्यातून बाहेर ओढून काढले आणि आम्हाला प्रकाशात आणले. आता प्रकाश आमचे वातावरण आहे, आणि ते आमच्या विचारप्रक्रिया, आचरणे, आणि संस्कृतींस घडविते. आणि आम्ही प्रकाशात आहोत

आणि अंधाराशी आमचा सहभाग नाही म्हणून आम्ही खरोखर वेगळे **आहोत**. आमेन!

## अंधार—नव्या करारात स्पष्ट केल्याप्रमाणे

### *असे स्थान जेथे दुष्कृत्ये करणारे लपतात*

**योहान 3:19**
**निवाडा हाच आहे की, जगात प्रकाश आला आहे आणि मनुष्यांनी प्रकाशापेक्षा अंधाराची आवड धरली; कारण त्यांची कृत्ये दुष्ट होती.**

मनुष्यांनी प्रकाशापेक्षा अंधाराची आवड धरली; कारण त्यांची कृत्ये दुष्ट होती. म्हणून अंधार ते स्थान आहे जेथे दुष्ट कामे करणारे लपू इच्छितात.

### *सैतानाची शक्ती*

**प्रेषितांची कृत्ये 26:18**
**मी तुला त्यांच्याकडे पाठवतो, ह्यासाठी की, त्यांनी अंधारातून उजेडाकडे व सैतानाच्या अधिकारातून देवाकडे वळावे, म्हणून तू त्यांचे डोळे उघडावेस, आणि त्यांना पापांची क्षमा व्हावी व माझ्यावरील विश्वासाने पवित्र झालेल्या लोकांमध्ये वतन मिळावे.'**

प्रभुने पौलास सांगितले, "मी तुला त्यांच्याकडे पाठवतो, ह्यासाठी की, त्यांनी अंधारातून उजेडाकडे व सैतानाच्या अधिकारातून देवाकडे वळावे." म्हणून, *"अंधार"* हा शब्द *"सैतानाच्या सामर्थ्याचा उल्लेख करतो."*

### *जे आत्मिकरित्या अंध आहेत*

**रोमकरांस पत्र 2:19**
**आणि नियमशास्त्रात आपल्याला ज्ञानाचे व सत्याचे स्वरूप उपलब्ध झाले आहे, म्हणून आपण आंधळ्यांचे वाटाडे, अंधारात असलेल्यांचा प्रकाश,**

## *तारण न पावलेल्यांचे ठिकाण*

**2 करिंथ 6:14,15**

**14 तुम्ही विश्वास न ठेवणाऱ्याबरोबर संबंध जोडून विजोड होऊ नका; कारण नीती व स्वैराचार ह्यांची भागी कशी होणार? उजेड व अंधार ह्यांचा मिलाफ कसा होणार?**

**15 ख्रिस्ताची बलियाराशी एकवाक्यता कशी होणार? विश्वास ठेवणारा व विश्वास न ठेवणारा हे वाटेकरी कसे होणार?**

2 करिंथ 6:14,15 या वचनांत, *"अंधार"* या शब्दाचा उल्लेख तारण न पावलेल्यांचे ठिकाण या अर्थाने केलेला आहे—अनीतिचे क्षेत्र, सैतानाचे क्षेत्र.

## *अंधाराचे सैतानी राज्यकर्ते*

**इफिसकरांस पत्र 6:12**

**कारण आपले झगडणे रक्तमांसाबरोबर नव्हे, तर सत्तांबरोबर, अधिकाऱ्याबरोबर, सध्याच्या काळोखातील जगाच्या अधिपतींबरोबर, आकाशातल्या दुरात्म्यांबरोबर आहे.**

आपण काळोखाच्या दुरात्म्यांविरुद्ध—काळोखातील जगाच्या अधिपतींविरुद्ध लढत आहोत. म्हणून पुन्हा एकदा, अंधाराचा उल्लेख अशा क्षेत्राच्या रूपात केला जातो ज्यात दुरात्मे कार्य करतात. हे निश्चितच  राहण्यासाठी चांगले वातावरण नाही!

## प्रकाश—नवीन करारात स्पष्ट केल्याप्रमाणे

आम्हा सर्व विश्वासणाऱ्यांसाठी सुवार्ता ही आहे की आम्हाला अंधकारातून बाहेर काढून उजेडात आणण्यात आले आहे.

## येशू प्रकाश आहे

येशूचे अनुसरण करणारे अंधारात चालणार नाहीत.

**योहान 8:12**
**पुढे येशू पुन्हा त्यांना म्हणाला, “मीच जगाचा प्रकाश आहे, जो मला अनुसरतो तो अंधारात चालणारच नाही, तर त्याच्याजवळ जीवनाचा प्रकाश राहील.”**

**योहान 12:46**
**जो कोणी माझ्यावर विश्वास ठेवतो त्याने अंधकारात राहू नये म्हणून मी जगात प्रकाश असा आलो आहे**

## *प्रभु येशूचे राज्य*

प्रकाश प्रभु येशूच्या राज्याचा उल्लेख करतो.

**कलस्सै 1:13**
**त्याने आपल्याला अंधाराच्या सत्तेतून काढून आपल्या प्रिय पुत्राच्या राज्यात आणून ठेवले.**

## *दिवसाची प्रजा*

**1 थेस्सल 5:5**
**कारण तुम्ही सगळे प्रकाशाची प्रजा व दिवसाची प्रजा आहात; आपण रात्रीचे व अंधाराचे नाही.**

परमेश्वर प्रकाश आहे आणि त्याच्याठायी अंधार नाही. तर नवीन करारामध्ये *"प्रकाश"* हा शब्द ते क्षेत्र सूचित करतो जेथे परमेश्वर आहे.

**1 योहान 1:5,6**
**5 जो संदेश आम्ही त्याच्यापासून ऐकला आहे तो तुम्हांला विदित करतो; तो संदेश हा की, देव प्रकाश आहे आणि त्याच्या ठायी मुळीच अंधार नाही.**
**6 त्याच्याबरोबर आपली सहभागिता आहे असे जर आपण म्हणत असलो, पण अंधारात चालत असलो, तर आपण खोटे बोलतो, सत्याने वागत नाही.**

**इफिसकरांस पत्र 5:8,11**
**8 कारण पूर्वी तुम्ही अंधकार असे होता पण आता तुम्ही प्रभूमध्ये प्रकाश असे आहात; प्रकाशाच्या प्रजेसारखे चाला;**

**11 अंधाराच्या निष्फळ कर्माचे भागीदार होऊ नका, तर उलट त्यांचा निषेध करा.**

एकेकाळी आम्ही अंधारात होतो, पण आता आम्ही प्रभुमध्ये प्रकाश आहोत. आणि आता आपण अंधाराच्या निष्फळ कामांत वाटेकरी होता कामा नये.

**रोमकरांस पत्र 12:1,2**

**1 म्हणून बंधुजनहो, मी देवाच्या करुणेमुळे तुम्हांला विनवतो की, तुम्ही आपली शरीरे जिवंत, पवित्र व देवाला ग्रहणीय यज्ञ म्हणून समर्पण करावीत; ही तुमची आध्यात्मिक सेवा आहे.**

**2 देवाची उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा काय आहे हे तुम्ही समजून घ्यावे, म्हणून ह्या युगाबरोबर समरूप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वतःचे रूपांतर होऊ द्या.**

मेसेज बायबल हे वचन अशाप्रकारे स्पष्ट करते *"आपल्या संस्कृतीशी इतके जुळवून घेऊ नका की आपण विचार न करता त्यात अनुरूप व्हाल"* (रोमकरांस पत्र 12:2अ).

समरूप =जे रूप, तऱ्हा, किंवा दुसऱ्याचे स्वरूप धारण करणे.

ते अशा सवयी, पद्धत, पोशाख, किंवा जीवनशैलीचा उल्लेख करू शकते जे जग धारण करते.

युग (ग्रीक *'आयोन'*)=युग, किंवा लोकांची पिढी.

रूपांतर=दुसरे स्वरूप धारण करणे

विश्वासू म्हणून आपल्या राहण्याच्या पद्धतीत खरा आणि आमूलाग्र फरक असायला हवा. आम्ही एकेकाळी अंधार होतो पण आता आपण प्रभूमध्ये प्रकाश आहोत आणि म्हणून आपण प्रकाशाची मुले म्हणून चालले पाहिजे. "चालणे" हा शब्द आपण जिथे चालतो त्याबद्दल

नाही तर आपल्या संपूर्ण अस्तित्वाचा संदर्भ देतो-आपले जीवन, आपण ज्या प्रकारे जगतो, आपले आचरण—मूलतत्वांवर, आपल्या जीवनातील प्रत्येक गोष्ट प्रकाशात जगणाऱ्यांप्रमाणे असावी, अंधारात जगणाऱ्यांप्रमाणे नाही. जेव्हा आपण कोणीतरी प्रकाशात असलेल्या व्यक्तीच्या रूपात चालत असतो, तेव्हा आपण अंधारात असलेल्या लोकांविरुद्ध धावत असतो. कारण जग अंधार आहे आणि आपण प्रकाश आहोत, आम्ही त्यांना विचित्र वाटू शकतो. आपण कदाचित त्यांना परक्यांसारखे वाटू आणि ते कदाचित आम्हाला समजून घेणार नाहीत का? कारण आपण प्रकाश आहोत आणि आपण अंधारात असलेल्यांच्या अगदी विरुद्ध असणार आहोत.

पवित्र शास्त्र आम्हाला शिकविते की आम्ही प्रकाशाची मुले म्हणून चालावे. म्हणून आपण अंधाराच्या लोकांपासून अगदी वेगळे चालू. आम्ही वेगळे आहोत! आमचे सहभागित्व अंधाराच्या निष्फळ कामासोबत असता कामा नये, पण आपण त्यांस उघडकीस आणावे. आपण प्रकाशाचे लोक आहोत म्हणून आपणास प्रकाशानुसार चालावयाचे आहे. आपण अंधारात जगणाऱ्या लोकांसोबत सहभागित्व किंवा भागीदारी करता कामा नये. जेव्हा आपण "'सहभागित्व'" या शब्दाविषयी बोलतो तेव्हा आपण एकाच जहाजातील दोन व्यक्तींची कल्पना करू शकतो! पवित्र शास्त्र आम्हाला जगाच्या "जहाजात प्रवेश करण्याविरुद्ध" सावधगिरीचा इशारा देते कारण अंधारात असलेल्या लोकांसोबत आमचे सहभागित्व नाही. त्याऐवजी आम्हास ते उघडकीस आणावयाचे आहे. आम्ही आपले जहाज चालविले पाहिजे किंवा त्यातच स्वार झाले पाहिजे—प्रकाशाच्या जहाजात. जग अंधाराच्या जहाजात जात असेल पण आपण त्यांच्यासोबत त्यात उडी मारू शकत नाही. अंधाराच्या कामांशी-अंधाराच्या कृत्यांशी आपली सहभागिता असू शकत नाही. ते करीत असलेल्या कामासोबत आपण त्यांच्याबरोबर भागीदारी करू शकत नाही कारण आपण प्रकाश आहोत.

परमेश्वराचे वचन आम्हास सांगते की आम्ही जगास समरूप होता कामा नये तर त्याऐवजी आमचे रूपांतरण घडून आले पाहिजे. पूर्वी स्पष्ट केल्याप्रमाणे "परिवर्तित" हा शब्द ग्रीक शब्द *'मेटॅमॉर्फोस'* पासून आला आहे. सुरवंट आणि फुलपाखरू यांच्यातील हा फरक आहे. तसेच, आपण भिन्न स्वरूप, वर्तणूक आणि विचार पद्धती धारण केल्या पाहिजेत. आम्ही या जगाशी समरुप होता कामा नये—जगाच्या चालीरीती, स्वरूप, सवयी, पद्धती, जीवनशैली आणि आचरण स्वीकारता कामा नये.

जेव्हा आमचे रूपांतर घडून येते तेव्हा आम्ही खरोखरच जगापासून वेगळे ठरतो. म्हणून आपण, तुम्ही आणि मी या जगास समरूप होता कामा नये, आम्हास बदलण्यासाठी,जगापासून वेगळे होण्यासाठी परमेश्वराने पाचारण केले आहे..

# 2
# परमेश्वराचे वचन विरुद्ध जगाची संस्कृती

## परमेश्वराच्या वचनास ज्या संस्कृतीत आम्ही जगत आहोत त्यापेक्षा अधिक उच्च अधिकार आहे

आम्ही हे समजून घेतले पाहिजे की ज्या संस्कृतीत आम्ही जगत आहोत तिच्यावर प्रकाशापेक्षा अंधाराचा अधिक प्रभाव आहे! आपण जगाच्या संस्कृतीनुसार जगत नाही तर प्रकाशाच्या संस्कृतीनुसार-ज्या राज्याचा आपण एक भाग आहोत त्या संस्कृतीनुसार जगतो. ही “राज्य संस्कृती” देवाच्या वचनात आपल्यासाठी स्पष्ट केली आहे. जगाच्या संस्कृतीत जी गोष्ट स्वीकारणीय आहे ती परमेश्वराच्या लिखित वचनाच्या विरुद्ध असू शकते. पण परमेश्वराची अपेक्षा आहे की आम्ही त्याच्या वचनाचे पालन करावे. जेव्हा आम्ही प्रकाशातील लोक म्हणून जगतो तेव्हा आम्ही वेगळे ठरतो. आम्ही समर्पित लोक ठरणार आहोत. ज्याने आम्हाला अंधारातून स्वतःच्या प्रकाशात बोलावले त्याची स्तुती करणारे आपण त्याचे स्वतःचे खास लोक होणार आहोत.

**रोमकरांस पत्र 12:2**
**देवाची उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा काय आहे हे तुम्ही समजून घ्यावे, म्हणून ह्या युगाबरोबर समरूप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वत:चे रूपांतर होऊ द्या.**

आपण ज्या संस्कृतीत राहतो तिचा भाग समजून आपल्यापैकी बरेच जण गोष्टी करत असतील. पवित्र शास्त्र आम्हास ताकीद देते की आम्ही आमच्या संस्कृतीशी विचार न करता जुळवून घेता कामा नये. याचे कारण हे आहे की परमेश्वराचे वचन आम्ही जगत असलेल्या संस्कृतीपेक्षा अधिक महत्त्वपूर्ण आहे. जर जगाच्या संस्कृतीत असे

काही असेल जे परमेश्वराच्या वचनाच्या विरुद्ध असेल तर आमचा एक मात्र पर्याय परमेश्वराच्या वचनाचे पालन करणे असले पाहिजे कारण ते आमच्या संस्कृतीपेक्षा श्रेष्ठ आहे. म्हणूनच  पवित्र शास्त्र आम्हास शिकविते की *"युगाबरोबर समरूप होऊ नका"* (रोमकरांस पत्र 12:2अा).

"युग" या शब्दासाठी दिलेला ग्रीक शब्द *'आयोन,'* जो वर्तमान समयाच्या आचरणाचा उल्लेख करतो. आपल्या सभोवतालच्या जगाच्या संस्कृतीस समरूप होऊ नका, पण त्याऐवजी तुमच्यात रुपांतर घडून यावे. ही परमेश्वराची आज्ञा आहे, फक्त सूचना नाही. आमेन!

# 3
# आम्ही वेगळे आहोत

अशी किमान दोन क्षेत्रे आहेत ज्यात तुम्ही आणि मी जगापेक्षा वेगळे आहोत.

## आम्ही सचोटी आणि प्रामाणिकपणासाठी वचनबद्ध आहोत

जगाला सचोटी आणि प्रामाणिकपणाची पर्वा नाही कारण ते अंधारात आहेत. परंतु पवित्र शास्त्र म्हणते की आपण प्रकाशाचे लोक आहोत, आपल्याला प्रकाशाची मुले म्हणून सचोटी आणि प्रामाणिकपणासाठी वचनबद्धपणे चालले पाहिजे.

**1 पतरस 2:9-12**

**9 पण तुम्ही तर 'निवडलेला वंश, राजकीय याजकगण, पवित्र राष्ट्र,' देवाचे 'स्वतःचे लोक' असे आहात; ह्यासाठी की, ज्याने तुम्हांला अंधकारातून काढून आपल्या अद्‌त प्रकाशात पाचारण केले 'त्याचे गुण तुम्ही प्रसिद्ध करावेत.'**
**10 ते तुम्ही पूर्वी 'लोक नव्हता,' आता तर 'देवाचे लोक आहात; तुम्हांला दया मिळाली नव्हती,' आता तर 'दया मिळाली आहे.'**
**11 प्रियजनहो, जे तुम्ही 'प्रवासी व परदेशवासी' आहात त्या तुम्हांला मी विनंती करतो की, जिवात्म्याबरोबर लढणाऱ्या दैहिक वासनांपासून दूर राहा.**
**12 परराष्ट्रीयांत आपले आचरण चांगले ठेवा, ह्यासाठी की, ज्याविषयी ते तुम्हांला दुष्कर्मी समजून तुमच्याविरुद्ध बोलतात त्याविषयी त्यांनी तुमची सत्कृत्ये पाहून 'समाचाराच्या दिवशी' देवाचा गौरव करावा.**

ज्याने आपल्याला *"अंधारातून त्याच्याकडे अद्‌त प्रकाशात पाचारण केले त्याची"* स्तुती आपण जाहीर केली पाहिजे. विश्वासणारे म्हणून, आम्हाला "परराष्ट्रीयांसमोर"—तारण न पावलेल्या जगासमोर आदरपूर्वक आणि प्रामाणिकपणे चालण्यासाठी पाचारण करण्यात

आले आहे. म्हणूनच, प्रकाशाचे लोक म्हणून आपण सचोटी आणि प्रामाणिकपणासाठी वचनबद्ध असले पाहिजे. जेव्हा लोक आपल्याकडे पाहतात तेव्हा त्यांना हे समजले पाहिजे की आपण वेगळे आहोत, कारण आम्ही सचोटी आणि प्रामाणिकपणासाठी वचनबद्ध आहोत.

## *विद्यार्थी म्हणून*

उदाहरणार्थ, शाळा किंवा महाविद्यालयात, तुम्ही तुमची परीक्षा लिहित असताना पर्यवेक्षक चहाच्या विश्रांतीसाठी बाहेर जातात आणि बाकीचे सगळे नकल करायला लागतात असे समजा. आणि तुमच्या शेजारी बसलेली व्यक्ती तुम्हाला तेच करायला सांगते. परंतु तुम्ही तुमच्या परीक्षेत नकल किंवा फसवणूक करण्यास नकार दिला पाहिजे, कारण तुम्ही पर्यवेक्षक परत येईल या भीतीने नाही तर तुम्ही प्रकाशाचे मूल आहात हे तुम्हाला माहीत आहे.

तसेच, तुमचा नेमून दिलेला गृहपाठ करत असताना, तुमच्या वर्गमित्राने केलेल्या गृहपाठाची प्रत बनवू नका आणि ती तुमचीच असल्याचे भासवू नका. का नाही? कारण आपण सचोटी आणि प्रामाणिकपणासाठी वचनबद्ध आहात!

## *व्यावसायिक म्हणून*

व्यावसायिक म्हणून आपण आपल्या जीवनात सचोटी राखली पाहिजे. आपण केवळ व्यावसायिक नाही, पण प्रकाशाचे मूल आहात, जे आपणास अशा व्यावसायिकांपेक्षा वेगळे बनवते जे अंधारात जगतात. आपण दोघे एकाच व्यवसायाच्या क्षेत्रात असू शकता, परंतु आपण दोघे कदाचित पूर्णपणे भिन्न लोक असाल. आणि फक्त कारण हे आहे की तुम्ही सचोटी आणि प्रामाणिकपणासाठी वचनबद्ध असल्यामुळे, तुम्ही तुमच्या परिचयपत्रामध्ये खोटे न बोलण्याचे निवडता.

जेव्हा मी आपला पहिल्या नोकरीसाठी अर्ज पाठवित होतो, तेव्हापर्यंतचा माझा सगळा वेळ विद्यापीठात संशोधन करण्यात घालवला होता. जेव्हा विद्यापीठाबाहेर नोकरी मिळवण्याची वेळ मजवर आली तेव्हा इतर लोक जे करतात तेच मी केले—काम नियुक्ती करणाऱ्या कंपनीकडे माझे परिचयपत्र पाठविले. माझ्या एका मित्राने माझी ओळख न्यू जर्सी येथील एका काम नियुक्त करणाऱ्या कंपनीशी करून दिली होती जी भारतीय लोक चालवत होते. म्हणून, त्यांनी वचन दिल्याप्रमाणे चांगल्या नोकरीत सहज नियुक्ती होईल या आशेने मी माझे परिचयपत्र त्यांना दिले. नंतर, मला त्यांचा फोन आला की त्यांनी माझ्या परिचयपत्रामध्ये काही बदल करणे आवश्यक आहे. त्यांनी माझ्या परिचयपत्रावर "पुन्हा काम" केले आणि रात्रभरात माझ्याजवळ दोन-तीन कंपनींचा कार्यानुभव आला ज्याच्याविषयी मी कधीच ऐकले नव्हते. **माझ्यापुढे एक पर्याय होता**—मी प्रकाशाचे मूल बनण्याची निवड करू शकत होतो किंवा वेगळे होण्याची निवड करू शकतो किंवा मी अंधाराचे मूल बनून खोटे बोलू शकत होतो. त्यांनी तयार केलेले परिचयपत्र मला वापरता येणार नाही असे सांगून मी नियुक्त करणाऱ्या कंपनीशी संवाद साधणे थांबवले. माझे परिचयपत्र हे एक साधे एका पानाचे होते आणि जे होते ते होते!.मग परमेश्वर मला एका चांगल्या कंपनीत नोकरी देईल, जिथे मी उद्योगातील काही उत्तम पद्धती शिकू शकेन, असा विश्वास ठेवून मी माझे परिचयपत्र थेट पाठवले. आणि परमेश्वराने केले! मला माझ्या परिचयपत्रावर खोटे किंवा फसवणूक करण्याची गरज नव्हती.

आमच्या संस्थेसाठी लोकांच्या मुलाखती घेत असताना, एकदा एक तरुण होता ज्याने आमच्या तांत्रिक चाचणीत चांगली कामगिरी केली होती, आणि मुलाखतीच्या शेवटच्या फेरीत माझ्याशी बोलायला आला होता. जेव्हा मी त्याला विचारले की तो कोणासाठी काम करतो तेव्हा त्याने काही कंपन्यांची नावे सांगितली आणि मला त्यांचा वेबसाइटचा पत्ता दिला. त्याने मला दिलेल्या **यू आर एलची** मी जेव्हा

पडताळणी केली तेव्हा ती एक सर्च इंजिन कंपनी असल्याचे दिसून आले आणि सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट कंपनी नव्हती ज्याविषयी तो बोलला होता. जेव्हा मी त्याला त्याविषयी पुन्हा विचारले तेव्हा त्याने उत्तर दिले की या कंपनीने आपले वेबसाईट बदलले असावे. त्यानंतर जेव्हा मी त्याला त्यांचा फोन नंबर मागितला, तेव्हा त्याने उत्तर दिले की त्याने त्याचे **सिम**कार्ड बदलले आहे आणि म्हणून त्याच्याजवळ त्यांचे नंबर नाहीत. मी त्याला त्यांच्या एखाद्या लँडलाईन नंबरविषयी विचारले आणि तो मला की म्हणाला की त्याला त्याविषयी सुद्धा माहित नाही. मी त्याला विचारले की त्या कंपनीसाठी त्याने एक वर्ष काम केले होते आणि तरीही त्याला त्यांचा लँडलाईन नंबर आठवत नव्हता हे कसे शक्य आहे, खरे पाहता बहुतेक कंपन्यांमध्ये कर्मचारी त्यांच्या कंपनीत अगदी थोडे दिवस काम केल्यानंतर त्यांच्या कार्यालयाचा फोन नंबर प्राप्त करतात. शेवटी त्या तरूणाने कबूल केले की त्याने आपल्या परिचयपत्रात कार्य अनुभवाविषयी खोटे लिहिले होते.

दुसऱ्या शहरातील एका ख्रिस्ती परिषदेत अशीच घटना घडली जेथे मी तीन दिवस प्रचार करण्यासाठी गेलो होतो. दोन सत्रांच्या दरम्यान एका तरुण व्यक्तीशी माझा परिचय घडून आला जो काही दिवसांपूर्वीच बँगलोरला आला होता आणि सॉफ्टवेअर डेव्हलपमेंटच्या एका निश्चित क्षेत्रात नोकरी शोधत होता. मी त्याला त्याचे नाव, पात्रता आणि पार्श्वभूमी विचारली. त्याने उत्तर दिले की त्याने "तीन महिन्यांचा कोर्स केला आहे पण पाच वर्षांचा अनुभव घेत आहे." मला त्याचा अर्थ काय आहे हे समजून घेणे आवश्यक होते आणि म्हणून आम्ही बँगलोरला परतल्यावर त्याला मला भेटण्यास सांगितले. नंतर तो मला भेटला आणि त्याने समजाविले की दोन वर्षे तो एका पाळकासोबत काम करीत होता, पूर्णकालीन सेवेत तो त्यांची मदत करीत होता. कालांतराने त्याला नोकरी करण्याची गरज भासली आणि म्हणून त्याने तीन महिन्यांसाठी एका व्यावसायिक अभ्यासक्रमात दाखला घेतला. त्या अभ्यासक्रमानंतर, त्याने असे म्हणत आपले परिचयपत्र लिहिले

की त्याच्याजवळ पाच वर्षांचा कार्यानुभव आहे, पण खरोखर तसे नव्हते. तो पुढे म्हणाला की तो मला यासाठी खरे सांगत आहे कारण मी पाळक आहे. मी कशी प्रतिक्रिया व्यक्त करावी हे मला कळेना पण मला आनंद झाला की त्याने कमीतकमी मला सत्य सांगितले होते. तथापि, मला दुःख झाले की दोन वर्षेपर्यंत एक मंडळीत परमेश्वराची पूर्णकालीन सेवा करणाऱ्या एखाद्या व्यक्तीने खोटे बोलावे, फक्त एक नोकरी मिळविण्यासाठी.

पवित्र शास्त्र म्हणते की आम्ही प्रकाशाची मुले म्हणून चालले पाहिजे, ज्याचा अर्थ हा आहे की व्यावसायिक म्हणून आमच्या प्रामाणिकपणात आम्ही कुठलीही तडजोड करू शकत नाही. ख्रिश्चन व्यावसायिक किंवा कर्मचारी या नात्याने, तुम्ही कार्यालयीन सुविधांचा गैरवापर करत नाही याची खात्री करा. पवित्र शास्त्र सुद्धा असेच म्हणते.

**तीत 2:9,10**

**9 दासांनी आपल्या धन्यांच्या अधीन राहावे; त्यांना सर्व प्रकारे संतुष्ट करावे, उलट बोलू नये,**

**10 त्यांना लुबाडू नये तर सर्व प्रकारे इमानेइतबारे वागावे, ह्यासाठी की, त्यांनी सर्व गोष्टींत आपला तारणारा देव ह्याच्या शिक्षणास शोभा आणावी, असा बोध कर.**

दासांनी—नोकरांनी—आपल्या मालकांच्या, किंवा त्यांच्या नियोक्त्यांच्या आज्ञेत राहावे. कर्मचाऱ्यांनी सर्व बाबतीत त्यांना संतुष्ट करावे आणि आपल्या अधिकाऱ्यास उलटून बोलू नये. हा पवित्र शास्त्राचा व्यवस्थापन सिद्धांत आहे. कर्मचाऱ्यानी चोरी करू नये, पण विश्वासूपणा दाखवावा, त्यांनी *"त्यांनी सर्व गोष्टींत आपला तारणारा देव ह्याच्या शिक्षणास शोभा आणावी."* म्हणून ख्रिस्ती कर्मचारी या नात्याने, जरी आपल्या कार्यातील इतर लोक चूक करीत असतील, तरीही आपण तसे करता कामा नये. आपणास वेगळे राहिले पाहिजे. ही आपल्या कंपनीची अव्यक्त संस्कृती असेल की दिलेल्या वेतनाशिवाय, कर्मचारी

त्यांच्या कार्यालयातील कोणत्याही गोष्टींचा फायदा घेऊ शकतात. पण प्रकाशाचे मूल म्हणून आणि अंधारातून त्या प्रकाशात चालण्यासाठी पाचारण करण्यात आलेले, कर्मचारी म्हणून, आपण फक्त तेच घ्यावे ज्याच्यासाठी आपणास वेतन दिले जाते आणि ज्याच्यासाठी आपण परिश्रम केले आहेत.

कुटील आणि दुष्ट पिढीमध्ये आपण परमेश्वराचे मूल आहात हे आपण जगास कसे दाखविणार आहात? पवित्र शास्त्र आम्हास शिकविते की आम्ही प्रामाणिक लोक म्हणून जगावे आणि सर्वकाही कुरकुर आणि तक्रार न करता आपले काम पूर्ण करावे, यासाठी की आम्ही स्वतस एका कुटील आणि दुष्ट पिढीमध्ये परमेश्वराची मुले म्हणून दाखवावे.

**फिलिप्पैकरांस 2:14,15**
**14 जे काही तुम्ही कराल ते कुरकुर व वादविवाद न करता करा;**
**15 ह्यासाठी की, ह्या कुटिल व विपरीत पिढीत तुम्ही निर्दोष व निरुपद्रवी अशी देवाची निष्कलंक मुले असे व्हावे. त्या लोकांमध्ये तुम्ही जीवनाचे वचन पुढे करून दाखवताना ज्योतीसारखे जगात दिसता.**

जर आपले सोबती कार्यालयात कुरकुर करीत असतील आणि तक्रार करीत असतील, आणि आपणसुद्धा त्यांच्यासोबत सहभागी होत असू, तर त्यांच्यात आणि आमच्यात काय फरक? सर्वकाही कुरकुर न करता आणि तक्रार न करता करण्याद्वारे, आम्हाला हे दाखविण्याची गरज आहे की आम्ही प्रकाशाचे मुले आहोत. आमेन!

आपल्यापैकी, नियोक्ते जे व्यवसाय चालवतात आणि आपल्या कर्मचाऱ्यांच्या पगाराबद्दल निर्णय घेतात, त्या आम्हास पवित्र शास्त्र सांगते की आम्ही लोकांस लुबाडता कामा नये किंवा त्यांचे वेतन रोखून धरता कामा नये.

**लेवीय 19:13**
**आपल्या शेजाऱ्यावर जुलूम करू नकोस व त्याला लुबाडू नकोस. मजुराची मजुरी रात्रभर, दिवस उजाडेपर्यंत आपल्याजवळ ठेवू नकोस.**

जर लोक आपल्यासाठी काम करीत असतील, तर त्यांना वेळेवर पगार द्यावा. आपण असे म्हणू शकता की कधीकधी वेतन रोखून धरणे "भारतीय कंपनीची संस्कृती" आहे. पण ऐका, आम्ही त्या संस्कृतीचे नसून देवाच्या राज्याच्या संस्कृतीचे आहोत! आणि परमेश्वर म्हणतो की ज्या व्यक्तीस आम्ही कामावर ठेवतो त्यांचे वेतन  रोखून धरता कामा नये. आपल्या कर्मचाऱ्याने त्याचे काम केले असेल तर त्याचे वेतन त्याला द्या.

**यिर्मया 22:13**
**"जो आपले घर अधर्माने बांधतो, आपल्या माड्या अन्यायाने उभारतो, आपल्या शेजाऱ्याकडून फुकट सेवा करून घेतो, त्याला वेतन देत नाही, तो हायहाय करणार."**

आपल्या शेजाऱ्याच्या सेवेचा उपयोग फुकटात करू नका. त्याने जे काही केले आहे त्याबद्दल त्याला काहीतरी मोबदला द्या. गृहिणींनो जर तुमची मोलकरीण तुमच्यासाठी काम करीत असेल तर तिला वेळेवर पगार द्या. वेगळे बना.

जेव्हा मी लोकांची मुलाखत घेतो, तेव्हा मी त्यांना विचारतो की त्यांनी सध्याच्या नोकऱ्या का सोडण्याचा विचार केला आहे. त्यांच्यापैकी काही जण मला सांगतात की त्यांना कमीत कमी सहा महिन्यांचे वेतन मिळालेले नाही! हे कर्मचारी सातशे लोकांच्या मोठ्या कंपनीत काम करणारे आहेत. परमेश्वराला अशी कार्यसंस्कृती मान्य नाही.

बँगलोरमध्ये एका कंत्राटदाराने एका मोठ्या सॉफ्टवेअर कंपनीसाठी मोठे छत उभारले होते. ते काम पूर्ण करण्यासाठी त्याने लक्षावधी रुपये गुंतविले होते आणि दोन वर्षे झाल्यानंतरही त्याला

त्याचा पैसा देण्यात आला नाही. प्रकाशाची मुले आणि नियोक्ते म्हणून, आम्ही जीवनाच्या सर्व क्षेत्रांत सचोटी आणि प्रामाणिकपणा राखण्यास शिकले पाहिजे ज्यात आमचे बोलणे आणि वर्तन या दोन्हींचा समावेश आहे.

**इफिसकरांस पत्र 6:9**
**धन्यांनो, तुम्हीही त्यांच्याशी तसेच वागा; व धमकावण्याचे सोडून द्या, कारण तुम्हांला हे ठाऊक आहे की, तुमचा व त्यांचा धनी स्वर्गात आहे आणि त्याच्याजवळ पक्षपात नाही.**

एका व्यक्तीसोबत माझ्या एका भेटीमध्ये यजमानाने मला कॉफी दिली आणि मी ती स्वीकारली. आमच्यासोबत असलेल्या दुसऱ्या व्यक्तीने नुकतीच न्याहारी केली आहे असे सांगून नकार दिला. मी यजमानाला अल्पोपाहारात सामील होण्यास सांगितले तेव्हा त्यांनी उपवास असल्याचे उत्तर दिले. लगेच तो दूसरा व्यक्ति ज्याने आत्ताच म्हटले होते की त्याने न्याहारी केली आहे, तो देखिल यजमानास प्रभावित करण्यासाठी म्हणाला की तो उपवास करीत आहे. मी विचार करू लागलो की आम्हा ख्रिस्ती लोकांमध्ये "प्रामाणिकपणाचे" काय झाले आहे. आपण जगापेक्षा वेगळे असायला हवे ना? आम्ही प्रकाशाचे लोक असायला हवे ना? आम्ही जगाबरोबर समरूप होता कामा नये पण आमचे रूपांतरण झाले पाहिजे आणि आम्ही परमेश्वराच्या पद्धतीनुसार आणि विचारानुसार जगले पाहिजे असे आपणास वाटत नाही का?

## आम्ही शुद्धाचरणास आणि शालीनतेस वचनबद्ध आहोत

**1 पेत्र 2:11आ**
**जिवात्म्याबरोबर लढणाऱ्या दैहिक वासनांपासून दूर राहा.**

शारीरिक वासनांपासून दूर राहा. ज्याने आम्हास अंधारातून त्याच्या अद्‌त प्रकाशात पाचारण केले आहे त्याची स्तुती करणारे लोक

म्हणून आम्हास देहवासनांपासून दूर राहिले पाहिजे. आम्ही शुद्धाचरण आणि शालीनता याप्रत वचनबद्ध असले पाहिजे.

## *तरुण स्त्रियांनो*

रिबेका सेंट जेम्स हे एका भक्तिमान तरुण स्त्रीचे उत्तम उदाहरण आहे, ही सुविख्यात ख्रिस्ती रॉक कलाकार आहे. ती अनेक ख्रिस्ती गीते गाते जी किशोर आणि 20 वर्षांच्या वयातील मुले ऐकतात. एमी गुडमन सोबतच्या Familylife.com च्या मुलाखतीत ती "शालीनतेस समर्पित" या शीर्षकाच्या विषयावर बोलली.

त्या प्रक्षेपणातील एक उतारा खालीलप्रमाणे आहे.

*रिबेका म्हणते, "मला वाटते की मी माझ्या स्वतःच्या आकर्षणाची भावना वेगळ्या गोष्टींत ठेवली आहे. तुम्हाला माहिती आहे, कारण मला माहीत आहे की मी ज्या प्रकारची वस्त्रे घालते त्या विशिष्ट प्रकारच्या पुरुषाला आकर्षित करतात आणि शेवटी मला पती म्हणून ज्या मुलाचा स्वीकार करावयाचा आहे तो शुद्धतेसाठी वचनबद्ध असावा. जो मनात वासना बाळगू इच्छित नाही. जर मी कोणत्याही प्रकारची मोहक वस्त्रे परिधान करीत असेन, तर मी अशा माणसाला आकर्षित करणार आहे ज्याला ते ठीक वाटते आणि पण त्याद्वारे असे दिसून येते की मी अशुद्ध आहे, पण त्याला ते ठीक वाटते; याउलट जर मी शालीन वस्त्रे घातली तर मी अशा माणसाला आकर्षित करणार आहे जो त्याचा आदर करतो आणि त्याचे कौतुक करतो. म्हणून मला अशाप्रकारे वस्त्रे घालणे आवडते.*

*मला सजावटी, मस्त, आधुनिक कपडे घालायला आवडतात आणि जी वस्त्रे शालीन आहेत, ज्यांनी देहप्रदर्शन होत नाही आणि जी खूप घट्ट नाहीत. ते शोधणे खूप कठीण आहे. पण ही योग्य लढाई आहे, कारण माझा शालीन असण्यावर विश्वास आहे आणि मी इतर तरुण*

*मुलींना चुकीच्या गोष्टी करण्यास प्रवृत्त करीत नाही, पण ख्रिस्तातील माझ्या भावांसाठी देखील मी अडखळणे आणि वासना निर्माण करीत नाही.*

*तुम्हाला माहिती आहे, बऱ्याच वेळा माझ्या वडिलांना जर असे वाटत असेल की मी थोडी फार अभद्रतेकडे जाणारी वस्त्रे घातली आहेत, तर ते म्हणतात, "अरे, हा मुलास आकर्षित करणारा पोशाख आहे." ते मला याबद्दल चिडवतात, पण जर त्यांना त्यात खरोखरच समस्या वाटत असेल तर ते थेट माझ्याकडे येतात. कधीकधी वडिलांना असे वाटते मी लहान लेकरू, मुलगी असल्याचे भासते, ज्यामुळे कदाचित मी परिधान केलेल्या गोष्टीबद्दल ते थोडेसे अधिक टीका करतात. आई त्यांना समजावते. आणि म्हणून मी त्या दोघांच्या मधला विचार करते, तुम्हाला माहिती आहे, माझ्या किशोरवयीन वर्षांमध्ये, विशेषत: मला काही चांगले संतुलित अभिप्राय मिळाले आहेत. जर फक्त माझ्या वडिलांची गोष्ट असती तर कदाचित एकाच थोडेसे अधिक चुकीच्या गोष्टीकडे कल असता, विशेषेकरून पुरातनवादाकडे. त्यांनी मला नेहमीच कसे कपडे घालावे, याविषयी प्रोत्साहन दिले आहे आणि मला असे वाटते विशेषेकरून, माझ्या आईने, अंगप्रदर्शन करणारे कपडे घालू नये, लहान स्कर्ट्स आणि शॉर्ट्स घालू नये, जास्त घट्ट कपडे घालू नये असे शिकविले आहे. मला नेहमी तसे मनात वाटत असे की असे करणे योग्य आहे. आणि मला त्यानुसार जगण्याची इच्छा होती. मला असे काहीही करावयाचे नव्हते ज्यामुळे माझे आईवडील अप्रसन्न होतील, मला परमेश्वरालाही अप्रसन्न करावयाचे नव्हते किंवा इतर लोकांना इजा करावयाची नव्हती. म्हणून मला असे वाटते की परमेश्वरासमोर ख्रिस्ती या नात्याने मला योग्य ते करायचे आहे ही माझी स्वतःची जबाबदारी आहे.*

*मजेदार हे आहे की जेव्हा मी पहिल्यांदा माझ्या संगीत गायकीची सुरुवात केली त्यावेळी कोटची फॅशन पहोती, आणि हे ठीक आहे*

*कारण आपणास माहीत आहे की कोट घालून आपण खरोखर शालीन दिसता. पण आता कोट फॅशनमध्ये नाही. आता मजेदार टॉप्स, आणि बरेचदा अंगप्रदर्शन करणारे टॉप्स घालण्याची फॅशन आपणास दूरदर्शनवर दिसून येते, अशी वस्त्रे दुकानात असतात आणि काहीतरी शालीन, पण त्याच वेळी मजेदार आणि मस्त असे कपड़े शोधणे फार कठीण असते.*

*मी ज्या प्रकारची वस्त्रे घालते त्याबाबत माझ्याकडे काही मार्गदर्शक तत्वे आहेत, स्टेजवर आणि स्टेजच्या बाहेरही. एका गोष्टीची मला जाणीव आहे की मी पँट घालू इच्छिते, विशेषकरून स्टेजवर, स्कर्टमध्ये अवतीभवती फिरताना फार कठीण जाते, विशेषकरून कारण मी रॉक संगीत गाते. तसेच मी या गोष्टीची खात्री करून घेते की मी जास्त घट्ट कपडे घातलेले नाहीत, जेणेकरून माझ्या शरीराचा आकार दिसून येऊ नये. सध्या मी जो टॉप घातलेला आहे तो जर मी असाच घातला तर तो फार घट्ट होईल. पण मी आतमध्ये दोन शर्ट घातलेले आहेत, म्हणून तो इतका घट्ट वाटत नाही. अशा प्रकारच्या वस्त्रांनी मुले चुकीच्या मार्गाने जाऊ शकतात. काही वर्षांपूर्वी आमच्या तरुण गटातील मुलींना प्रचार करण्यासाठी आमच्या चर्चमध्ये एक स्त्री वक्ता म्हणून आली होती. ती म्हणाली, या तरूण गटाविषयी मुले तक्रार करीत आहेत की त्यांना कुठे पाहायचे ते कळत नाही. ते परमेश्वराची उपासना करण्यासाठी आणि त्याच्या आणखी जवळ जाण्यासाठी येत आहेत आणि त्यांना अशा मुली दिसतात ज्या घट्ट कपडे घालतात आणि कपडे पुरेसे देखील नसतात, म्हणून कोठे पाहावे ते त्यांना कळत नाहीत. हे खरोखर मन विचलित करणारे आहे. शालीनता ही महत्त्वाची किल्ली आहे. मला असे वाटते की आपण कसे वस्त्र घालतो याचे सामर्थ्य आणि प्रभूमधील भावांवर, मुलांवर त्याचा कसा परिणाम घडतो हे अनेक मुलींना कळत नाही."*

आपण या उताऱ्यामधील एक महत्त्वाचे विधान पाहू या.

रिबेका म्हणते की ज्या प्रकारची वस्त्रे ती घालते त्याद्वारे "एका विशिष्ट प्रकारच्या" मुलास आकर्षण प्राप्त होते. तरुण मुलींनो, जर तुम्ही अशा प्रकारची वस्त्रे घालत असाल तर तुम्ही त्यामुळे तशा प्रकारच्या मुलांना आकर्षित कराल. अशा प्रकारच्या मुलांनी आपला पती बनावे असे आपणास वाटते का? आपल्यापैकी काहींना अद्याप अनिश्चित वाटत असेल. रिबेका जे म्हणते ते खूप समजण्यासारखे आहे.

जर कोणाला मस्त कपडे घालावे आणि छान दिसावे असे वाटत असेल तर ती म्हणजे रिबेका सेंट जेम्स असावी. ती हजारो लोकांसमोर स्टेजवर गायन गाते, तिने अनेक अल्बम काढले आहेत. मला नक्कीच खात्री आहे की तिला मस्त कपडे घालायला, छान दिसायला आणि मोठ्या गर्दीला आकर्षित करायला आवडेल. पण त्याऐवजी ती म्हणते की, *“मी ज्या पद्धतीने कपडे घालते ते इतके महत्त्वाचे आहे की मला शालीन असावेसे वाटते, कारण मी इतर तरुण मुलींना चुकीच्या मार्गाने नेऊ इच्छित नाही. आणि ख्रिस्तामधील माझ्या भावास मी अडथळा आणू इच्छित नाही, त्यांना वासनेमध्ये गुंतवू इच्छित नाही.”* येथे एक तरुण प्रसिद्ध मुलगी आहे जी शालीनतेसाठी वचनबद्ध आहे आणि तिने ख्रिस्ती म्हणून अत्यंत स्पष्ट शब्दात आपली बाजू मांडली आहे.

तरुण स्त्रियांनो, आपणास जगातील इतर स्त्रियांपेक्षा वेगळे राहण्याची गरज आहे, आपणास शुद्धतेप्रत आणि शालिनतेप्रत वचनबद्ध असले पाहिजे. त्यामुळे कदाचित आपणास आपल्या मैत्रिणींमध्ये ‘बदकाचे कुरूप पिल्लू’ असल्यासारखे वाटत असेल, पण पवित्र शास्त्र म्हणते की परमेश्वर आंतरिक सुंदरतेच्या शोधात आहे.

**1 पेत्र 3:3,4**

**3 तुमची शोभा केसांचे गुंफणे, सोन्याचे दागिने घालणे किंवा उंची पोशाख करणे अशी फक्त बाहेरून दिसणारी नसावी,**

**4 तर जो सौम्य व शांत आत्मा देवाच्या दृष्टीने बहुमूल्य आहे त्याची म्हणजे**

**अंतकरणातील गुप्त मनुष्यपणाची, अविनाशी शोभा असावी.**

आपण परमेश्वराच्या दृष्टीस सुंदर दिसू इच्छिता की पुरुषाच्या नजरेत?

आपली निवड करा!

**1 तीमथ्य 2:8-10**

**8 प्रत्येक ठिकाणी पुरुषांनी राग व विवाद सोडून पवित्र हात वर करून प्रार्थना करावी अशी माझी इच्छा आहे.**

**9 तसेच स्त्रियांनी स्वतःस साजेल अशा वेषाने आपणांस भीडस्तपणाने व मर्यादेने शोभवावे; केस गुंफणे आणि सोने, मोती व मोलवान वस्त्रे ह्यांनी नव्हे,**

**10 तर देवभक्ती स्वीकारलेल्या स्त्रियांना शोभते तसे सत्कृत्यांनी आपणांस शोभवावे.**

पौल प्रार्थनासभेच्या वातावरणाचे वर्णन करतो जेथे पुरुष पवित्र हात उंचावत आहेत आणि स्वर्गाच्या दिशेने पाहत आहेत आणि नंतर अचानक पौल विषय बदलून म्हणतो, *"तसेच स्त्रियांनी स्वतःस साजेल अशा वेषाने आपणांस भीडस्तपणाने व मर्यादेने शोभवावे."* पौलाने स्त्रियांच्या वस्त्रपरिधानाच्या विषयास का संबोधित करावे? मला असे वाटते की त्याकाळी त्यांना देखील याच समस्यांना तोंड द्यावे लागत असावे ज्यांचा आज आम्ही सामना करीत आहोत. पुरुष आपले पवित्र हात उंचविण्याचा आणि परमेश्वराकडे पाहण्याचा प्रयत्न करतात, पण काहीतरी त्यांना विचलित करते आणि त्यांस खाली ओढते. आणि म्हणूनच पौल प्रार्थना करणाऱ्या स्त्रियांस शिकवितो की त्यांनी स्वतःस साजेल अशा वेषाने आपणांस भीडस्तपणाने व मर्यादेने शोभवावे; केस गुंफणे आणि सोने, मोती व मोलवान वस्त्रे ह्यांनी नव्हे, तर देवभक्ती स्वीकारलेल्या स्त्रियांना शोभते तसे सत्कृत्यांनी आपणांस शोभवावे. तरूण स्त्रियांनो, स्वतःस साजेल अशा वेषाने आपणांस भीडस्तपणाने व मर्यादेने शोभतील अशी वस्त्रे घातल्याने आपल्यात आत्मसंयम असल्याचे दिसून येईल. पौल ख्रिस्ती स्त्रियांसाठी जो आदर्श घालून देतो तो म्हणजे अशाप्रकारे वस्त्रे परिधान करावी ज्यामुळे देवभक्ती

जाहीर होते आणि व्यक्त होते. आमेन! म्हणून आपण वस्त्रांची निवड कशाप्रकारे करता याविषयी विचार करा.

- त्यामुळे देवभक्ति जाहीर होते का?
- त्यामुळे स्वरूप जाहीर होते का?
- त्यामुळे धार्मिकतेची घोषणा होते का?
- त्यामुळे परमेश्वरप्रत भक्ति जाहीर होते का?

या गोष्टींनी आपली वस्त्रांची निवड निर्धारित करावी.

## *आईवडिल*

रिबेकाच्या आईवडिलांचा तिच्यावर असलेला प्रभाव पहा. ती प्रसिद्ध व्यक्ती आहे. पण तरीही, ते तिच्या चालण्याच्या मार्गावर आणि तिच्या जगण्याच्या मार्गावर प्रभाव टाकू शकतात. आईवडिलांनो! आपणास आपल्या किशोर वयातील आणि  वीस वर्षांच्या मुलांशी बोलण्याची गरज आहे. असे म्हणून आपल्या जबाबदारीत मागे पडू नका की आपण त्यांना मंडळीमध्ये पाठवाल, आणि आशा आहे की पाळक पुलपिटवरून या समस्यांविषयी त्यांच्याशी बोलतील.

## *वृद्ध स्त्रिया*

**तीत 2:4,5**
**4 त्यांनी तरुण स्त्रियांना असे शिक्षण द्यावे की, त्यांनी आपल्या नवऱ्यावर व मुलाबाळांवर प्रेम करावे;**
**5 त्यांनी मर्यादशील, शुद्धाचरणी, घरचे काम पाहणाऱ्या, मायाळू, आपापल्या नवऱ्याच्या अधीन राहणाऱ्या, असे असावे, म्हणजे देवाच्या वचनाची निंदा होणार नाही.**

पौल वृद्ध स्त्रियांना सांगतो की त्यांनी तरुण स्त्रियांस असे शिक्षण

द्यावे की त्यांनी मर्यादशील आणि शुद्धाचरणी असावे. “मर्यादशील आणि शुद्धाचरणी” “असणे म्हणजे, गंभीर, सद्‌णी, शुद्ध, निर्दोष, आणि पवित्र असणे आहे.” हा परमेश्वराचा आदर्श आहे.

तरुण स्त्रिया हा वाद घालू शकतात की इतर लोक, त्यांच्या मैत्रिणीसुद्धा कसे अंग प्रदर्शन करणारी वस्त्रे घालतात, आणि त्यांनीच का शालीन वस्त्रे घालावी. ते असा विचार करू शकतात की जर पुरुषांना अशा पोशाखाविषयी समस्या असेल तर, ही त्यांची समस्या असू शकते. मुळीच नाही! तरुण स्त्रियांना हे शिकविण्याची गरज आहे की ज्या प्रकारचे वस्त्र ते घालतील त्याद्वारे ते अगदी तशाच प्रकारच्या मुलास आकर्षित करतील. म्हणून, ही त्यांची समस्या देखील बनू शकते. स्त्रियांनी अशाप्रकारची वस्त्रे परिधान करता कामा नये जी मुलांस चुकीच्या मार्गास नेतील. त्यांनी शालीन आणि मर्यादशील पद्धतीने वस्त्रे घालावी  जी ईश्वरभक्तीविषयी साक्ष देतात, कारण त्या प्रकाशाच्या मुली आहेत. परमेश्वराचे वचन आम्हा सर्वांना सांगते की आम्ही इतरांसाठी अडखळण बनता कामा नये आणि म्हणून वृद्ध स्त्रियांना गरज आहे की त्यांनी तरुण स्त्रियांस असे बनू नये म्हणून प्रशिक्षण दयावे.

## तरुण पुरुष

**1 थिस्सल 4:3-5**

**3 कारण देवाची इच्छा ही आहे की, तुमचे पवित्रीकरण व्हावे, म्हणजे तुम्ही जारकर्मापासून स्वतःला अलिप्त ठेवावे.**

**4 देवाला न ओळखणाऱ्या परराष्ट्रीयांप्रमाणे कामवासनेने नव्हे,**

**5 तर पवित्रतेने व अब्रूने तुमच्यातील प्रत्येकाने आपल्या देहावर ताबा कसा ठेवावा ते समजून घ्यावे.**

परमेश्वराने आम्हास अनैतिकतेसाठी पाचारण केलेले नाही, तर पवित्रतेसाठी पाचारिले आहे. *“कारण देवाची इच्छा ही आहे की तुमचे*

*पवित्रीकरण व्हावे"*—आपणास परमेश्वरासाठी वेगळे करण्यात आले आहे. आणि तरुण पुरुषांस ज्या सर्वात मोठ्या आव्हानांस तोंड दयावे लागते, त्यापैकी एक आहे डोळ्यांची वासना.

**1 थेस्सल 5:22**
**वाईटाच्या प्रत्येक प्रकारापासून दूर राहा.**

वाईटाच्या सर्व प्रकारांपासून दूर राहा. उदाहरणार्थ, मी कबूल करतो की बँगलोरच्या रस्त्यांवर गाडी चालविणे फार कठीण आहे. तुम्ही गाडी चालवत असताना तुम्हाला देवाशी संवाद साधण्यासाठी आध्यात्मिक वातावरण देण्यासाठी कारमध्ये स्तुती आणि उपासनेची गाणी वाजवली जाऊ शकतात, पण रस्त्यावर गाडी चालवीत असतांना आपण लहानशा गाडीच्या बाजूला उभी असलेल्या अगदी कमी वस्त्रे घातलेल्या स्त्रीची मोठी जाहीरात पाहता. आपल्या मनात विचार येतो की ते स्त्रीला विकत आहेत की गाडी विकत आहेत! तरीही आपल्या समोरून येणाऱ्या बसला टक्कर मारण्याच्या भितीने आपण डोळे बंद करू शकत नाही!

आपण आपले सकाळचे वर्तमानपत्र उघडतो आणि बातम्यांचे शीर्षक वाचू इच्छितो, पण आपले सर्वप्रथम लक्ष शीर्षकावर जात नाही, तर प्रत्येक पानात अश्लील वस्त्रे घातलेल्या स्त्रीवर जाते. म्हणून आपण दुसरे वर्तमानपत्र घेण्याचे ठरविता, पण आपणास दिसून येते की प्रत्येक वर्तमानपत्र दुसऱ्या वर्तमानपत्रांशी स्पर्धा करण्याचा प्रयत्न करीत आहे! म्हणून आपण वर्तमानपत्रांची वर्गणी थांबवू शकता आणि त्याऐवजी इंटरनेटवरील बातमी वाचण्याचे ठरवू शकता. आपण निरागसपणे लिंकवर क्लिक करता, पण परिणाम सारखाच आहे, कारण अश्लीलता सर्वत्र पसरली आहे. म्हणून, आपण काय करावे?

आपण संडेस्कूलमध्ये गात असलेले कोरस मला आठवते ...

*खबरदार लहान डोळे काय बघतात*
*खबरदार लहान डोळे काय बघतात*
*कारण तुझा पिता आकाशातून*
*बघतो मोठ्या प्रेमाने*
*खबरदार लहान डोळे काय बघतात*

संडेस्कूलमध्ये शिकविण्यात आलेल्या गोष्टी बरेचदा फार गंभीर असतात. या पाठांचे स्वरूप भविष्यात्मक असल्यासारखे वाटते, कारण 50 वर्षानंतरही आम्ही कोणत्या गोष्टींस तोंड देणार आहोत हे त्या गोष्टी दर्शवितात.

आम्हाला स्वतःस हे सांगत राहण्याची गरज आहे की आम्ही प्रकाशाची मुले आहोत. आम्ही पहिली नजर टाळू शकत नाही, पण दुसरी नजर अवश्य टाळू शकतो. आम्हास हे माहीत नसेल की जाहिरातीचा बोर्ड तेथे लागलेला असेल आणि म्हणून आपण तो पाहिला असेल, पण त्या बोर्ड जवळून जात असतांना जर आम्ही दुसरी नजर मारण्यासाठी मागे वळून पाहत असाल, तर आमच्यात समस्या आहे. आम्ही आमच्या जीवनात शुद्धाचरण आणि शालीनता यास वचनबद्ध असले पाहिजे कारण आपण प्रकाशाची मुले आहोत आणि म्हणून आपण दुसरी नजर टाकण्यास नकार दिला पाहिजे. आमेन!

- **पालक,** आपणास आपल्या किशोर वयातील आणि वीस वर्षांच्या मुलांशी बोलण्याची गरज आहे. असे म्हणून आपल्या जबाबदारीत मागे पडू नका की आपण त्यांना मंडळीमध्ये पाठवाल, आणि आशा आहे की पाळक पुलपिटवरून या समस्यांविषयी त्यांच्याशी बोलतील.
- **वृद्ध स्त्रिया,** त्यांनी तरुण स्त्रियांस असे शिक्षण दयावे की

त्यांनी मर्यादशील आणि शुद्धाचरणी असावे. "मर्यादशील आणि शुद्धाचरणी" असणे म्हणजे, गंभीर, सद्‌णी, शुद्ध, निर्दोष, आणि पवित्र असणे आहे. हा परमेश्वराचा आदर्श आहे.

- **तरुण,** परमेश्वराने आम्हास अनैतिकतेसाठी पाचारण केलेले नाही, तर पवित्रतेसाठी पाचारिले आहे. *"कारण देवाची इच्छा ही आहे की तुमचे पवित्रीकरण व्हावे"*—आपणास परमेश्वरासाठी वेगळे

## डेटिंगचा मापदंड (एकमेकांना भेटण्याचे मापदंड)

### *तरुण लोक*

जेव्हा आपण आपल्या मित्रास किंवा मैत्रिणीस भेट देण्यास किंवा डेटिंगसाठी जाता, तेव्हा शारीरिकरित्या सहभागी होणे टाळा आणि अशा ठिकाणी जाऊ नका जेथे अशा गोष्टी करण्याची शक्यता असेल ज्याविषयी इतरांनी जाणू नये असे आपणास वाटते. एकटे, फक्त दोघे जाणे, राहणे टाळा, आणि ते सुद्धा बंद दारांमागे. आपणास माहित आहे की इतर सर्व जण शारीरिकरित्या सहभागी होत असतील, पण लक्षात ठेवा आपण वेगळे आहात. आपण आपल्या जीवनात शुद्धाचरणास समर्पित आहात.

### *आई-वडिलांनो*

आईवडिलांनी जागे होण्याची गरज आहे. आपणास आपल्या किशोरवयीन आणि विशीतील मुलांशी बोलण्याची गरज आहे. आपण आपल्या मुलास किंवा मुलीस सल्ला देण्यासाठी पाळकाच्या मदतीसाठी विनंती करू शकता, पण परमेश्वराने आपणास जे करण्यासाठी जबाबदार ठरविले आहे त्याची पाळकाकडून किंवा मंडळीकडून अपेक्षा करू नका. जोवर आपली मुले आपल्यासोबत आपल्या छताखाली राहत आहेत आणि आपल्या मेजावर खात आहेत, तोवर आपण त्यांचे अधिकारी आहात. मंडळी त्यांना परमेश्वराचे वचन

शिकवील, त्यांनी पवित्र आत्म्याने भरून जावे आणि ख्रिस्तामध्ये परिपक्व व्हावे म्हणून प्रयत्न करील पण आईवडील म्हणून मुले आपली जबाबदारी आहेत.

उदाहरणार्थ, आपला मुलगा कॉलेजमधून एक मुलगी घेऊन येत असेल आणि आपल्या बैठकीच्या खोलीत बसण्याऐवजी ते तुमच्या मुलाच्या खोलीत जाण्याची आणि दार बंद करण्याची निवड करतात. आपण मुलीसाठी कॉफी बनविण्यात गुंतलेले असाल, आणि आपण त्यांना एका बंद खोलीत एकटे पाहता, तर कृपा करून दारावर ठोठवा, त्यांना खोलीबाहेर काढा कारण आपल्या घरात दार बंद करून राहण्याचे त्यांना काहीही काम नाही. जर तुम्ही तसे केले तर तुमचा मुलगा दुसऱ्या दिवशी तुमच्याकडे घरी परत येणार नाही याची तुम्हाला भीती वाटू शकते. आपण असे म्हणून त्याच्या ह्या वर्तनास सोडून देऊ शकता की तो विश्वासूपणे चर्चला जातो, तरुणांच्या सर्व सभांना जातो, तो अतिशय धार्मिक मुलगा आहे, आणि म्हणून तो आत काहीही चुकीचे करीत नसेल.

आईवडिलांनो लक्षात ठेवा की तुमच्या तरुण मुलांचे हार्मोन्स बदलत आहेत. आणि आम्ही चर्चमध्ये लोकांचे "हार्मोन्स" बदलू शकत नाही! म्हणून जरी हे खरे असले की आपली मुले विश्वासूपणे मंडळीत भाग घेतात, तरीही आपण घरी त्यांच्यासाठी जबाबदार आहात. ख्रिस्ती या नात्याने  पवित्र शास्त्र आम्हास त्यांच्याकडून ज्या शुद्धतेचा आणि शालीनतेचा आदर्श पालन करवून घेण्यास सांगते त्यावर आपणास अंमलबजावणी करण्याची गरज आहे. काय योग्य आणि काय अयोग्य हे सांगण्यात मंडळी आपली भूमिका पार पाडेल. पण जेव्हा आपण आपल्या मुलांना विपरीत लिंगाच्या सदस्याबरोबर बंद दारामागे राहण्याची परवानगी देत असाल, तर दुर्बलतेच्या एका क्षणात त्यांचे हार्मोन्स सर्व प्रवचनांस जे त्यांनी मंडळीत ऐकले आहेत आणि त्यांच्या डोक्यावर ठेवण्यात आलेल्या सर्व प्रार्थनापूर्ण हातांना डावलून पार

जातील. आपल्या मुलांशी व्यवहार करण्याच्या बाबतीत आईवडिलांनी शिस्तीचे पालन केले पाहिजे, अन्यथा एक दिवस आपणास कळून येईल की  आपण आपल्या स्वतच्या घरात धार्मिकतेचा आदर्श मांडण्यास विफल ठरला आहात.

## *विवाहित दाम्पत्य*

विवाहित दाम्पत्यांनो, आम्हाला आमच्या जीवनात शुद्धता राखण्याची गरज आहे. पती आणि पत्नीने एकमेकांप्रत वचनबद्ध असले पाहिजे. आम्ही ख्रिस्ती आहोत—लोकांचा प्रकाश! आम्हास आपल्या स्वतच्या वैवाहिक जीवनात शुद्धता आणि शालीनता याप्रत वचनबद्ध असले पाहिजे. पती-पत्नींनो, तुमच्या लैंगिक गरजा तुमच्या वैवाहिक जीवनात पूर्ण करा. बाहेर पाहण्यास नाकार द्या. जगातील इतर लोक यौन संतुष्टीसाठी बाहेर पाहत असतील, पण आपण वेगळे आहोत.  पवित्र शास्त्र म्हणते की,

**1 पेत्र 2:9**

**तुम्ही तर 'निवडलेला वंश, राजकीय याजकगण, पवित्र राष्ट्र,' देवाचे स्वतचे लोक' असे आहात; ह्यासाठी की, ज्याने तुम्हांला अंधकारातून काढून आपल्या अद्‌भुत प्रकाशात पाचारण केले 'त्याचे गुण तुम्ही प्रसिद्ध करावेत.**

प्रकाशाचे लोक म्हणून जगण्यासाठी तुम्हाला आणि मला अंधारातून पाचारण करण्यात आले आहे.  पवित्र शास्त्र म्हणते की आम्ही प्रकाश आहोत आणि म्हणून आपण प्रकाशाची मुले म्हणून चालायला हवे. आपण आपल्या सभोवतालच्या जगापासून पूर्णपणे वेगळे असले पाहिजे. आमच्या कामाच्या किंवा व्यवसायाच्या ठिकाणी, एक कर्मचारी म्हणून, एक नियोक्ता म्हणून, एक गृहिणी म्हणून, आपल्याला आपल्या आजूबाजूच्या लोकांपेक्षा आपण पूर्णपणे भिन्न असले पाहिजे. परमेश्वराला आपल्याकडून हेच हवे आहे. एक तरुण माणूस म्हणून, तरुणी, एक पालक, एक पती, एक पत्नी म्हणून आम्ही

वेगळे आहोत. आम्ही आमच्या जीवनात पवित्रतेसाठी वचनबद्ध आहोत आणि त्याबाबत तडजोड नाही. तडजोड नेहमीच बंदिवास आणते. ज्या दिवशी आपण आपल्या आयुष्यात तडजोड करू लागतो, तेव्हा आम्ही खात्री बाळगू शकतो की आपण आपल्याच तुरुंगात बंदिवान केले जाऊ.

# आपणास माहीत आहे का की देव आपणावर प्रीती करतो?

सुमारे 2000 वर्षांपूर्वी, देव मानव म्हणून या जगात आला. त्याचे नाव येशू आहे. तो सिद्ध पापरहित जीवन जगला. येशू हा देहधारी परमेश्वर होता, म्हणून जे काही त्याने म्हटले आणि केले, त्याद्वारे त्याने देवास आमच्यावर प्रगट केले. तो जी वचने बोलला, तो देवाची वचने बोलला. त्याने जी कार्ये केली, ती देवाची कार्ये होती. येशूने पृथ्वीवर अनेक चमत्कार केले. त्याने रोग्यांस व क्लेशितांस बरे केले. त्याने आंधळ्यांचे डोळे उघडले, लंगड्यांस चालविले आणि प्रत्येक प्रकारचे रोग व आजार त्याने बरे केले. भाकरीच्या तुकड्यास आश्चर्यजनकरित्या बहुगुणित करून त्याने भुकेल्यास अन्न दिले, वादळ शांत केले आणि इतर अनेक अद्‌त गोष्टी केल्या.

**ह्या सर्व गोष्टी आम्हास प्रगट करतात की देव चांगला परमेश्वर आहे ज्याची इच्छा आहे की लोकांनी बरे, स्वस्थ, आरोग्यसंपन्न आणि आनंदित असावे. देव लोकांच्या गरजा पूर्ण करू इच्छितो.**

तर, देवाने मनुष्य बनण्याचा आणि आमच्या जगात प्रवेश करण्याचा निर्णय का घ्यावा? येशू का आला?

आम्ही सर्वांनी पाप केले आहे आणि अशा गोष्टी केल्या आहेत ज्या आम्हास उत्पन्न करणाऱ्या देवासमोर अमान्य आहेत. पापाचे परिणाम आहेत. पाप हे देव आणि मानवातील एका मोठ्या भिंतीसारखे आहे जी पार करता येत नाही. पाप हे आम्हास देवापासून वेगळे करते. ज्याने आम्हास उत्पन्न केले आहे त्यास जाणण्याच्या आणि त्याच्यासोबत अर्थपूर्ण नाते स्थापन करण्याच्या मार्गात ते आम्हास अडखळण आणते. म्हणून, आमच्यापैकी कित्येक जण इतर गोष्टींनी हे रिक्त स्थान भरून टाकण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या पापांचा दुसरा परिणाम देवापासून सदाकाळसाठी अलग होणे होय. देवाच्या न्यायालयात, पापाचे वेतन मरण आहे. मृत्यू देवापासून दूर नरकात सार्वकालिक ताटातूट आहे.

पण, सुवार्ता ही आहे की आपण पापांपासून मुक्त राहू शकतो आणि देवाशी पुन्हा नाते स्थापन करू शकतो. बायबल म्हणते, ***"पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे"*** **(रोमकरांस पत्र 6:23).** येशूने जेव्हा वधस्तंभावर आपला प्राण दिला, तेव्हा त्याने संपूर्ण जगाच्या पापांची किंमत चुकविली, मग तीन दिवसानंतर तो पुन्हा जीवंत झाला, त्याने अनेकांस स्वतःला जीवंत दाखविले आणि मग तो स्वर्गास परतला.

देव प्रीती आणि दयेचा देव आहे. त्याची अशी इच्छा नाही की कोणीही व्यक्तीने नरकात नाश व्हावे. म्हणून तो संपूर्ण मानवजातीस पापापासून आणि त्याच्या स्थायी परिणामांपासून मुक्त होण्याचा मार्ग दाखवावयास आला. तो पाप्यांस तारावयास-आपल्यासारख्या आणि माझ्यासारख्या लोकांस पापापासून आणि सार्वकालिक मृत्यूपासून वाचवावयास आला.

पापांची ही विनामूल्य क्षमा प्राप्त करण्यासाठी, बायबल आम्हास सांगते की आम्ही फक्त एक गोष्ट केली पाहिजे—प्रभु येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर जे काही केले त्याचा स्वीकार करणे आणि संपूर्ण अंतःकरणाने त्याच्याठायी विश्वास धरणे.

***"त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात"*** **(प्रेषितांची कृत्ये 10:43).**

***"की येशू प्रभु आहे असे जर तू आपल्या मुखाने कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल"*** **(रोमकरांस पत्र 10:9).**

जर आपण प्रभु येशू ख्रिस्ताठायी विश्वास ठेवला, तर आपण देखील पापांपासून क्षमा प्राप्त करू शकता आणि शुद्ध होऊ शकता.

प्रभु येशू ख्रिस्तामध्ये आणि वधस्तंभावर त्याने आपणासाठी जे काही केले आहे त्याच्यावर विश्वास करण्याचा निर्णय घेण्यात आपली मदत करण्यासाठी खाली एक सोपी प्रार्थना दिलेली आहे. येशूने आपणासाठी काय केले आहे त्याचा स्वीकार व्यक्त करण्यात आणि आपल्या पापांपासून शुद्धता प्राप्त करण्यात ही प्रार्थना आपली मदत करील. ही प्रार्थना केवळ एक मार्गदर्शक आहे. आपण आपल्या शंब्दांत देखील प्रार्थना करू शकता.

*प्रिय प्रभु येशू, आज मला कळले की वधस्तंभावर तू माझ्यासाठी काय केले. तू माझ्यासाठी मरण पत्करलेस: तू तुझे बहुमूल्य रक्त वाहिलेस आणि माझ्या पापांचा दंड चुकविलास, यासाठी की मला क्षमा प्राप्त व्हावी. बायबल मला सांगते की जो कोणी तुजवर विश्वास ठेवील, त्याला त्याच्या पापांची क्षमा केली जाईल.*

*आज, मी तुजवर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतो आणि वधस्तंभावर माझ्यासाठी मरण पत्करून व पुन्हा मेलेल्यांतून जीवंत होऊन तू जे काही माझ्यासाठी केलेस, त्याचा मी स्वीकार करतो. मी जाणतो की माझ्या सत्कृत्यांद्वारे मी स्वतःचे तारण साध्य करू शकत नाही, इतर कोणीही मनुष्य माझे तारण घडवून आणू शकत नाही. मी माझ्या पापांची क्षमा कमवू शकत नाही.*

*आज, मी आपल्या अंतःकरणात विश्वास धरतो आणि माझ्या मुखाने हे कबूल करतो की तू मजसाठी मरण पत्करलेस, तू माझ्या पापांची किंमत चुकविलीस, तू पुन्हा मेलेल्यांतून उठलास, आणि तुझ्यावरील विश्वासाद्वारे, मला माझ्या पापांची क्षमा आणि शुद्धता प्राप्त होते.*

*येशू, मी तुझे उपकार मानतो. तुजवर प्रीती करण्यात, तुला आणखी जाणून घेण्यात, आणि तुझ्याप्रत विश्वासू राहण्यात माझी मदत कर.*

*आमेन.*

# विषयी ऑल पीपल्स चर्च

बँगलोर शहरात मीठ आणि प्रकाश ठरावे, आणि भारत देशात तसेच संपूर्ण जगातील राष्ट्रांत एक आवाज़ बनणे हा ऑल पीपल्स चर्च चा दृष्टांत आहे.

ऑल पीपल्स चर्च ही एक **येशूवर प्रीती करणारी, वचनावर केंद्रित, आत्म्याने भरलेली**, कौटुंबिक मंडळी, सुसज्जीकरण केंद्र, मिशन ठिकाण आणि जागतिक सुवार्ता केन्द्र आहे.

- एक **कौटुंबिक चर्च** म्हणून, आम्ही ख्रिस्त केंद्रित सहभागित्वामध्ये एक समुदाय म्हणून एकत्र वाढतो, देवाची मंडळी म्हणून प्रेमाने एकमेकांची काळजी घेतो आणि सेवा करतो.
- एक **सुसज्जीकरण केंद्र** म्हणून, आम्ही प्रत्येक विश्वासणाऱ्याला विजयाने जगण्यासाठी, ख्रिस्ताच्या समानतेमध्ये परिपक्क होण्यासाठी आणि त्यांच्या जीवनासाठी देवाचे हेतू पूर्ण करण्यासाठी सक्षम आणि सुसज्ज करतो.
- एक **मिशन स्थळ** म्हणून, आम्ही देवाच्या वचनाद्वारे आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याच्या अलौकिक प्रकटीकरणाद्वारे येशू ख्रिस्ताच्या संपूर्ण सुवार्तेसह आमच्या शहरास, राष्ट्रास आणि राष्ट्रांना आशीर्वादित करण्यासाठी अर्थपूर्ण सेवेत सहभागी होतो.
- एक **जागतिक सुवार्ता केंद्र** म्हणून, आम्ही धार्मिक पुढाऱ्याचे आणि आत्म्याने भरलेल्या मंडळ्यांचे पालनपोषण करून स्थानिक आणि जागतिक स्तरावर सेवा करतो, जेणेकरून त्यांना देवाच्या राज्यासाठी त्यांच्या क्षेत्रांवर प्रभाव टाकता यावा.

एपीसी मध्ये, आम्ही देवाचे संपूर्ण वचन कुठल्याही प्रकारची तडजोड न करता, पवित्र आत्म्याच्या अभिषेकाने व प्रकटीकरणाने सादर करण्याप्रत वचनबद्ध आहोत. आमचा विश्वास आहे की उत्तम संगीत, रचनात्मक सादरीकरण, बुद्धिमत्तापूर्ण तत्वसमर्थन, समकालीन सेवाकार्याच्या पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान इत्यादी गोष्टी पवित्र आत्म्याची चिन्हे, चमत्कार, अद्‌त कार्ये, आणि पवित्र आत्म्याच्या कृपादानांद्वारे वचनाची घोषणा करण्याच्या देवाने नेमलल्या पद्धतीची जागा घेऊ शकत नाहीत  (1 करिंथ 2:4,5; इब्री 2:3,4). आमचा विषय येशू आहे, आमची विषयवस्तु वचन आहे, आमची पद्धत पवित्र आत्म्याचे सामर्थ्य आहे, आमचा आवेश लोक आहेत, आणि आमचे ध्येय ख्रिस्तासमान परिपक्कता आहे.

आमचे मुख्यालय बँगलोर येथे आहे, पण ऑल पीपल्स चर्चच्या भारतात कित्येक ठिकाणी शाखा आहेत. ऑल पीपल्स चर्चची वर्तमान यादी आणि संपर्क सूचना यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी **apcwo.org/locations** किंवा या पत्त्यावर ई-मेल पाठवावा **contact@apcwo.org.**

# विनामूल्य प्रकाशने

A Church in Revival
A Real Place Called Heaven
A Time for Every Purpose
Ancient Landmarks
Baptism in the Holy Spirit
Being Spiritually Minded and Earthly Wise
Biblical Attitude Towards Work
Breaking Personal and Generational Bondages
Change
Code of Honor
Divine Favor
Divine Order in the Citywide Church
Don't Compromise Your Calling
Don't Lose Hope
Equipping the Saints
Foundations (Track 1)
Fulfilling God's Purpose for Your Life
Gifts of the Holy Spirit
Giving Birth to the Purposes of God
God Is a Good God
God's Word—The Miracle Seed
How to Help Your Pastor
Integrity
Kingdom Builders
Laying the Axe to the Root
Living Life Without Strife
Marriage and Family
Ministering Healing and Deliverance
Offenses—Don't Take Them
Open Heavens
Our Redemption
Receiving God's Guidance
Revivals, Visitations and Moves of God
Shhh! No Gossip!
Speak Your Faith
The Conquest of the Mind
The Father's Love
The House of God
The Kingdom of God
The Mighty Name of Jesus
The Night Seasons of Life
The Power of Commitment
The Presence of God
The Redemptive Heart of God
The Refiner's Fire
The Spirit of Wisdom, Revelation and Power
The Wonderful Benefits of Praying in Tongues
Timeless Principles for the Workplace
Understanding the Prophetic
Water Baptism
We Are Different
Who We Are in Christ
Women in the Workplace
Work—Its Original Design

नवीन पुस्तके नियमितपणे प्रकाशित केली जातात. PDF, ऑडियो तसेच इतर स्वरूपात विनामूल्य ऑल पीपल्स चर्च पुस्तके डाऊनलोड करण्यासाठी कृपा करून **apcwo.org/books** या संकेतस्थळास भेट द्यावी. यापैकी अनेक पुस्तके इतर भाषांतही उपलब्ध आहेत. तसेच, विनामूल्य ऑडियो आणि विडियो संदेश, संदेशाचे नोट्स टी.वी. कार्यक्रम आणि इतर अनेक सामुग्रींसाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी: **apcwo.org/sermons.**

# क्रिसलिस कॉउंसलिंग

क्रिसलिस कॉउंसलिंग लोकांना जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि त्यावर मात करण्यासाठी वैयक्तिक सल्ला देते. क्रिसलिस कॉउंसलिंग हा व्यावसायिक, प्रशिक्षित आणि अनुभवी ख्रिस्ती सल्लागारांचा संघ आहे.

आमच्या सेवा सर्व वयोगटांसाठी आहेत आणि जीवनातील अनेक आव्हानांना सामोरे जातात.

| | |
|---|---|
| **किशोरवयीन मुलांसाठी** | **वर्तणूक विकार** |
| **वैयक्तिक सल्ला** | **व्यक्तिमत्व विकार** |
| **नातेसंबंधांशी संबंधित आव्हाने** | **मानसिक भावनिक /** |
| **शिक्षेतील उणीव** | **अडचणी** |
| **कामाशी संबंधित समस्या** | **तणाव/आघात** |
| **कुटुंब/संपत्ती/विवाहपूर्व वैवाहिक** | **मद्यपान/अमली पदार्थांचे सेवन** |
| **पालक/मुले/भावंडे/समवयस्क** | **आध्यात्मिक समस्या** |
| | **लाईफ कोचिंग** |

क्रिसलिस कॉउंसलिंग सेवांसाठी शुल्क परवडणारे आणि प्रवेशयोग्य आहेत.

आमच्या प्रशिक्षित सल्लागारांसोबत भेटीची वेळ निश्चित करण्यासाठी

**वेबसाईट : chrysalislife.org**

**फोन :** +91-80-25452617 किंवा टोल-फ्री (भारतांतर्गत) 1-800-300-00998

**ई-मेल : counselor@chrysalislife.org**

क्रिसलिस कॉउंसलिंग ही ऑल पीपल्स चर्च आणि वर्ल्ड आऊटरीचची सेवा आहे.

# ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी

ऑल पीपल्स चर्च स्थानिक मंडळ्यांच्या रूपात संपूर्ण भारत देशात, विशेषतः उत्तर भारतात सुवार्ता गाजवीत आपल्या सरहद्दीपलीकडे सेवा करीत आहे. त्याचे विशेष ध्येय (अ) पुढाऱ्यास स्थिर करणे, (आ) तरूणांस सेवेसाठी सुसज्ज करणे आणि (इ) ख्रिस्ताच्या मंडळीची वाढ करणे आहे. तरूणांसाठी प्रशिक्षण सम्मेलन, 'ख्रिस्ती पुढाऱ्यासाठी सभांचे' संपूर्ण वर्षभर आयोजन केले जाते. याशिवाय, पुस्तकांच्या कित्येक हजारो प्रतींचे इंग्रजी आणि इतर अनेक भारतीय भाषांत विनामूल्य वितरण केले जाते, त्यामागे हेतू हा आहे की विश्वासणाऱ्यास वचन आणि आत्म्यात वाढ करून द्यावी.

आम्ही आपणास निमंत्रण देतो की एका वेळेचे दान पाठवून किंवा मासिक आर्थिक दान पाठवून आर्थिकरित्या आमच्यासोबत भागिदारी करावी. संपूर्ण राष्ट्रात हे कार्य करता यावे म्हणून जी दानराशी आपण पाठवू शकता, त्यासाठी आम्ही आपले आभारी राहू.

आपण आपल्या देणग्या चेक / बैंक ड्राफ्टच्या द्वारे "All Peoples Church" बँगलोरच्या नावावर आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवू शकता किंवा खालील माहितीच्या आधारे आमच्या बँक खात्यात टाकू शकता :

**बँक खात्याचे नाव:** All Peoples Church
**बँक खाते क्रमांक:** 50200068829058
**IFSC क्रमांक:** HDFC0004367
**बँक:** HDFC Bank, 7M/308 80 Ft Rd, HRBR Layout,
Kalyan Nagar, Bengaluru - 560043, Karnataka

***कृपया लक्षात ठेवा:*** *ऑल पीपल्स चर्च केवळ भारतीय नागरिकांच्या बँकेद्वारे मिळालेली देणगी स्वीकार करू शकते. आपली इच्छा असल्यास, आपली देणगी पाठवीत असतांना, स्पष्टपणे लिहा की आपण एपीसी सेवेच्या कोणत्या क्षेत्रासाठी दान पाठवू इच्छिता. अतिरिक्त माहितीसाठी कृपया या स्थळास भेट द्यावी* **apcwo.org/give.**

त्याचप्रमाणे, आमच्यासाठी व आमच्या सेवाकार्यासाठी शक्य तेव्हा प्रार्थना करणे विसरता कामा नये.

**धन्यवाद आणि परमेश्वर देव आपणास आशीर्वादित करो!**

DOWNLOAD THE FREE APP!

*Search for*
"All Peoples Church Bangalore"
in the App or Google play stores.

Available on the App Store

ANDROID APP ON Google play




*A daily 5-minute video devotional.*
*A daily Bible reading and prayer guide.*
*5-minute Sermon summary.*
*Toolkit with Scriptures on various topics to build faith and information to share the Gospel.*
*Resources with sermons, sermon notes, TV programs, books, music and more.*

*IF YOU LOVE IT, TELL OTHERS ABOUT IT!*

# ऑल पीपल्स चर्च बायबल कॉलेज

**apcbiblecollege.org**

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षणकेंद्र भारताच्या बँगलोरमध्ये आत्म्याने परिपूर्ण, अभिषिक्त, सक्रिय सेवेत सहभागी प्रशिक्षणआणि सिद्धांताच्या दृष्टीने योग्य व परमेश्वराच्या वचनाच्या बौद्धिक दृष्टीने प्रेरणादायक अभ्यासासह पवित्र आत्म्याच्या अलौकिक सामर्थ्यात विद्यार्थ्यांस सेवेसाठी तयार करते. आम्ही सेवेसाठी संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर विश्वास ठेवतो. तसेच या प्रशिक्षणात ईश्वरीय चारित्र्य, परमेश्वराच्या वचनाचा गंभीर पाया, आणि चिन्ह, चमत्कार व अद्भुत कृत्ये यावर जोर दिला जातो—सर्वकाही प्रभुच्या निकट सान्निध्यात प्रवाहित होते.

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज (एपीसी-बीसी) मध्ये, योग्य शिक्षणाशिवाय, आम्ही प्रत्यक्षपणे देवाचे प्रेम, अभिषेक आणि पवित्र आत्म्याचे सान्ध्यि आणि देवाच्या अलौकिक कार्यावर जोर देतो. अनेक तरूण स्त्रीपुरुषांनी हे प्रशिक्षण घेतले आहे आणि त्यांच्या आयुष्यात देवाचे पाचारण पूर्ण करण्यासाठी त्यांना सेवेत पाठविण्यात आले आहे.

पुढील तीन पदव्या दिल्या आहेत,

- मध्ये एक वर्षांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (C.Th.)
- मध्ये दोन वर्षांचा डिप्लोमा अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (Dip.Th.)
- मध्ये तीन वर्षांचा स्नातक अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (B.Th.)

वर्ग प्रत्येक आठवड्याच्या दिवशी, **सोमवार ते शुक्रवार भारतीय वेळ (UTC+5:30) सकाळी 9 ते दुपारी 12** पर्यंत चालविले जातात. आम्ही तीन शिक्षण पर्याय देऊ करतो

**ऑन-कॅम्पस :** कॅम्पसमध्ये वैयक्तिकरित्या वर्गांना उपस्थित रहा
**ऑनलाइन :** ऑनलाइन प्रत्यक्ष व्याख्यानांना उपस्थित रहा
**ई-लर्निंग :** ऑनलाइन पोर्टल **apcbiblecollege.org/elearn** द्वारे स्वतःच्या गतीने शिकणे.

**ऑनलाइन अर्ज,** करण्यासाठी आणि कॉलेज, अभ्यासक्रम, पात्रता निकष, शिकवणी खर्च आणि अर्ज डाउनलोड करण्यासाठी अधिक माहितीकरिता, कृपया या संकेतस्थळास भेट द्या **apcbiblecollege.org.**

तुम्ही आणि मी देवाचे “स्वतःचे खास लोक” आहोत. जर आपण ख्रिस्ती—विश्वासणारे असाल तर आपण पात्र आहात! पवित्र शास्त्र स्पष्ट करते की आपण “निवडलेला वंश, राजकीय याजकगण, पवित्र राष्ट्र, देवाचे स्वतःचे लोक” (1 पेत्र 2:9) असे आहोत हे यासाठी की आपण त्या परमेश्वराची स्तुती, उत्कृष्टता श्रेष्ठता, अद्‌भुतता आणि गुण घोषित केले, प्रचार केले पाहिजेत, गाजविले पाहिजेत हे घोषित, प्रचार आणि गाजविले पाहिजेत ज्याने आम्हास आपल्याला अंधारातून काढून त्याच्या अद्‌भुत प्रकाषात प्रकाशात पाचारिले पाचारण केले आहे.

जेव्हा लोक आम्हाला, ख्रिस्ती लोकांना पाहतात, तेव्हा त्यांना हे पाहण्याची गरज आहे की ज्याने आम्हास पाचारण केले आहे तो किती उत्कृष्ट, सद्‌गुणी, परिपूर्ण आणि अद्‌भुत परमेश्वर आहे म्हणून, जेव्हा लोक आपल्याला, विश्वासणाऱ्यांना पाहतात, तेव्हा त्यांना हे पाहणे आवश्यक आहे की ज्या देवाने आपल्याला त्याचे म्हटले आहे तो किती उत्कृष्ट, सद्‌गुणी, परिपूर्ण आणि अद्‌भुत आहे.

परमेश्वराला चांगले दाखवावे म्हणून तुम्ही आणि मी पृथ्वीवर आहोत! आपण वेगळे, भिन्न आहोत!

**आपण वेगळे आहोत!**




All Peoples Church & World Outreach
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: contact@apcwo.org
Website: apcwo.org